वाचा: 1. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 69 पोट कलम (1) मधील तरतुदी.

2. तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी वैदयकीय आरोग्य अधिकारी व स्वच्छता अधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकाराबाबतचे आदेश जा.क्र.नमुंमपा/आरोग्य/7353/2003 दि.24/10/2003.

3. तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) व स्वच्छता अधिकारी व उप स्वच्छता निरीक्षक यांना प्रदान केलेल्या अधिकाराबाबतचे आदेश जा.क्र.नमुंमपा/घ.क.व्य.)/3917/2009 दि.08/12/2009.

4. तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांचा आदेश जा.क्र.नमुंमपा/प्रशा/आस्था-1/अधि/प्र.क्र.7/2072/2012 दि.12/06/2012.

5. तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांचा आदेश जा.क्र.नमुंमपा/प्रशा/आस्था-1/अधि/प्र.क्र.7/2013 दि.22/02/2013.

6. तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांचा आदेश जा.क्र.नमुंमपा/परवाना/2876/2015 दि.11/09/2015.

7. मा. आयुक्त यांची मंजुर टिपणी दिनांक 28/09/2017.

---

**आदेश**

जा.क्र.नमुंमपा/परवाना/ ५१७८ /2017
दिनांक : ०५ / १२ /2017

महाराष्ट्र लोकसेवा अध्यादेश 2015 च्या कलम 3 अन्वये नवी मुंबई महानगरपालिकेने व्यवसाय परवाना, साठा परवाना व उद्योगधंदा परवानगी संदर्भातील एकुण 12 लोकसेवा दिनांक 29/09/2017 रोजी अधिसुचित केलेल्या आहेत. त्यानुसार लोकसेवांची अंमलबजावणी करणेसाठी,

मी डॉ. रामास्वामी एन., आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका, मला असलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 244, 245, 313, 318, 337, 338, 339, 376, 376(अ), 383, 384, 385, 386 (2), व 296 इत्यादी कलमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या अधिकारांपैकी यापुर्वी सहा. आयुक्त तथा मुख्य बाजार व परवाना अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले अधिकार मी या आदेशाद्वारे अधिग्रहित करीत असून यापुढे हे अधिकार उप आयुक्त (परवाना), सहा. आयुक्त / विभाग अधिकारी व उप स्वच्छता निरिक्षक यांना उक्त अधिनियमातील कलम 69 चे पोटकलम (1) च्या तरतुदीच्या अधिन राहून मी प्रदान करीत आहे.

विभाग अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत असलेल्या अधिकारांची अंमलबजावणी त्यांनी प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने परवाना विभागाच्या उप आयुक्तांच्या नियंत्रणाखाली व त्यांच्या पुर्ननिरिक्षणाच्या व नियमाद्वारे विहीत करण्यात येतील अशा किंवा या अधिनियमाच्या तरतुदींशी किंवा नियमांशी विसंगत नसेल अशा रितीने करावे.

उप आयुक्त (परवाना) / सहाय्यक आयुक्त / विभाग अधिकारी यांना व त्यांच्या अधिनस्त उप स्वच्छता निरीक्षक यांनी या आदेशासोबत जोडलेल्या सहपत्रातील संक्षिप्त तरतुदींनुसार त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करावी. प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा गैरवापर केल्यास अथवा कसुर केल्यास अशा दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द नियुक्ती प्राधिकार तथा आयुक्त कायदेशीर कारवाई करतील.

यापुर्वी या संदर्भात निर्गमित करण्यात आलेला संदर्भ क्रमांक 6 वरील आदेशाच्या सहपत्रातील भाग (ब) मध्ये नमुद कलम 313,337,338,339,376 व 376(अ) चे अधिकार या आदेशान्वये विभाग अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत. तसेच, सदर आदेशातील सहपत्रातील भाग (अ), भाग (ब) मध्ये नमुद कलम 383,384,385,386(2) व भाग (क) व इतर बाबींमध्ये कोणतेही बदल करण्यात आलेले नसून सदर आदेश पारित करण्यात येत आहे.

सदर आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी.

आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका

प्रत - माहितीस्तव व पुढील कार्यवाही करीता.

1. संबंधितांस
2. सर्व विभाग / कार्यालय प्रमुख --------------------

Scanned by CamScanner

सहपत्र

**ब) सहाय्यक आयुक्त / विभाग अधिकारी, यांना प्रदान करावयाचे अधिकारी.**

| कलम क्र. | संक्षिप्त तपशिल | प्रदान करावयाच्या मर्यादित अधिकाराचा तपशिल. |
|---|---|---|
| 313 | कारखाने व उद्योगधंदे विनियमन | ज्यात वाफ, पाणी, विद्युत शुक्ती यांचा उपयोग करावयाचा योजिले असेल असा कोणताही कारखाना कर्मशाळा अथवा बेकरी यांना परवानगी देणे. |
| 337 | मानवी आहारासाठी ठेवलेल्या वस्तूंची पाहणी करणे. | उप आयुक्त (परवाना) यांच्या मार्गदर्शनाखाली उक्त कलमातील कायदेशीर तरतूदींची अंमलबजावणी सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोणातून करणेसाठी तपासणी व दोषी व्यक्तीविरुध्द कायदेशीर कारवाई प्रस्तावित करणे. |
| 338 | आरोग्यास अपायकारक वस्तू इत्यादींचे अभिग्रहण करणे. | |
| 339 | कलम 338 अन्वये अभिग्रहण केलेल्या वस्तूंची विल्हेवाट लावणे. | |
| 376 | भाग 1 ते 4<br>लायसन्सशिवाय विवक्षित गोष्टी न ठेवणे व विवक्षित व्यवसाय व कामे न करणे. | अधिनियमातील कलम 376 च्या तरतुदींनुसार सार्वजनिक आरोग्य विषयक व्यवसायाची तपासणी करुन कलम 376 (अ) अंतर्गत उपद्रव निर्माण करणा-या व्यक्ती / संस्था विरुध्द उप आयुक्त (परवाना) यांच्या अधिपत्याखाली कायदेशीर कारवाई प्रस्तावित करावी. |
| 376 (अ) | एखाद्या जागेचा वापर करणे हे घातक / उपद्रवकारक असेल तेव्हा असा वापर बंद करण्याचा अधिकार | |
| 468 | नियम, उपविधी, विनियम किंवा स्थायी आदेश यांचा भंग करण्याबददल शास्ती. | नियम, उपविधी, विनियम किंवा स्थायी आदेश यांचा कोणत्याही प्रकारे भंग करण्याबददल अपराध्यास अपराध सिध्दी नंतर दंडाची शिक्षा करावी. |

तसेच अनुसूची (ड) मधील प्रकरण - 14 मधील नियम 25 - 31 व प्रकरण 18 चे अधिकार संबंधितांना प्रदान करण्यात येत आहेत.

वरील सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून, प्राथमिकदृष्ट्या आवश्यक असलेले अधिकार संबंधितांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 387 मधील पोटकलम (2) चा (1) तसेच (ब), (क), (ड), (ई), (ग), (ह) व (य) मधील तरतुदींचे पालन करुन इमारतीच्या अंतर्गत प्रवेश करण्याचा मर्यादित अधिकार उक्त अधिनियमातील 388 च्या तरतुदीला अधिन राहून उप आयुक्त (परवाना) व सहा. आयुक्त / विभाग अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहे. तसेच दिवाणी न्यायालय व जिल्हा न्यायालय येथे न्यायालयीन प्रकरणात महानगरपालिकेची बाजू मांडण्यासाठी शपथपत्र दाखल करण्याचे व त्या अनुषंगिक कार्यवाही करण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त / विभाग अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका

Scanned by CamScanner